स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ ,नांदेड

मानव्य विद्याशाखा अंतर्गत लोकप्रशासन विषयात विद्या वाचस्पती (पीएच.डी) पदवी करीता सादर करावयाच्या संकल्पित प्रबंधाची रूपरेषा

राज्य प्रशासनात तहसीलदारांची भूमिका :एक अभ्यास
विशेष संदर्भ लातूर जिल्हा

अभ्यासक

जगताप संजय अंकुशराव

लोकप्रशासन विभाग

महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव

ता. अहमदपूर जि. लातूर (मो.९५५२९७४९७६)

मार्गदर्शक

प्रा.डॉ.बंजारा दिलीप लालू

लोकप्रशासन विभाग प्रमुख

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर जि. लातूर

संशोधन केंद्र

देगलूर महाविद्यालय ,देगलूर जि. नांदेड

2022

राज्य प्रशासनात तहसीलदारांची भूमिका: एक अभ्यास विशेष संदर्भ लातूर जिल्हा

१. प्रास्ताविक:

आधुनिक काळात लोकप्रशासन अत्यंत महत्त्वाचे आहे. सुखकर समृद्ध मानवी जीवनासाठी लोकप्रशासन महत्त्वाचे तत्व बनले आहे. व्यक्ती, समाज, शासन व राष्ट्र या सर्वांच्या प्रगतीचा आधार लोकप्रशासन आहे .व्यक्तीच्या दैनंदिन जीवनात राज्याचे येणारे संबंध प्रशासनाच्या मार्फतच येतात म्हणून प्रशासनाचे महत्त्व प्रत्येक नागरिकांना न सांगताही पटण्यासारखे असते. आर्थिक व सामाजिक समस्या सोडवून समाजाचे कल्याण साधने चांगल्या शासनाचे ध्येय असते. व्यापक अर्थाने विचार केल्यास राज्याचे अंतिम ध्येय हेच प्रशासनाचे कार्य उद्दिष्टे असतात.

राज्य, मग ते लोकशाही, राजेशाही, सर्वंकष हुकुमशाही या प्रकारांपैकी कोणतेही असो प्रशासनाशिवाय ते अस्तित्वात राहूच शकत नाही. विभिन्न प्रकारानुसार प्रशासनाचे स्वरूप मात्र बदलत असते. राजकीय व्यवस्था, राजकीय तत्वज्ञान, राज्यघटना, शासन संस्थेचे प्रकार स्थळ काळ सापेक्ष बदलत जातात पण प्रशासन मात्र निरंतर व सार्वत्रिक चालणारी प्रक्रिया व व्यवस्था आहे.आधुनिक राज्याच्या कार्यक्षेत्राबरोबर प्रशासनाची कार्य व्याप्ती वाढलेली आहे. समाजातील सर्व व्यक्तीच्या हिताचे संरक्षण व संवर्धन राज्य प्रशासनाद्वारेच करीत आहे. प्रशासनाशिवाय आज आपण आधुनिक राज्याची कल्पना करू शकत नाहीत. म्हणून आजच्या राज्याला 'प्रशासकीय राज्य' असे म्हटले जात आहे.

अन्य शासन प्रकारापेक्षा लोकशाहीत लोकप्रशासनाचे महत्त्व अधिकचआहे. "लोककल्याण' हा शासनाचा हेतू उद्देश साध्य करण्यासाठीचे साधन लोकप्रशासनच आहे. आधुनिक राज्याने लोकशाही ,कल्याणकारी राज्य या व्यक्ती विकासवादी संकल्पनाचा स्वीकार केलेला आहे. परिणामी राज्याच्या कार्यात सुद्धा अमर्याद वाढ झालेली आहे .ही वाढलेली कार्य पूर्वीसारखी साधी व सरळ नाहीत तर क्लीस्ट व गुंतागुंतीची आहेत. त्यासाठी कार्यक्षम, निष्णात प्रशासक वर्गाची गरज आज निर्माण झालेली आहे . या कार्याच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी नवीन काल सुसंगत नियम, प्रशासन पद्धती, रुढी, प्रघात निर्माण करावे लागत आहेत .या दृष्टीने प्रशासनाची नवीन व्यवस्था तयार करावी लागत आहे.

भारतीय प्रशासनाचा विचार करीत असताना असे दिसते की, भारतीय प्रशासन व्यवस्थेला प्राचीन ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. भारतीय प्रशासनात कालौघात काही नवीन प्रशाकीय संस्था ,पद्धती, यंत्रणा व प्रशाकीय घटकाची निर्मिती झाली आहे तर काही घटक लोप पावत गेले आहेत. अनेक राजे महाराजे यांच्या राजकीय व प्रशासकीय नेतृत्वाने लाभान्वित झालेली ही प्रशासन व्यवस्था आहे .इतिहासाच्या वेगवेगळया कालखंडात त्या त्या शासनाच्या ध्येय धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी

प्रशासकीय सोय म्हणून विविध प्रादेशिक प्रशासकीय विभाग निर्माण करावी लागली. त्यांची नावे स्थल व काल परत्वे वेगवेगळी होती.स्वातंत्र्यापूर्वी भारतात प्रामुख्याने शासनाचे दोन स्तर होते एक मध्यवर्ती (केंद्रीय) स्तर दुसरे स्थानिक यात मध्यवर्ती स्तरावर राजा किंवा संस्थानिक आणि त्यांची प्रशासकीय यंत्रणा स्थानिक स्तरावर स्थानिक शासन संस्था यांची प्रशासकीय यंत्रणा कार्यरत होती. त्यात प्राचीन काळापासून आजच्या जिल्ह्यासारखा प्रादेशिक विभाग अस्तित्वात होता परंतु वेगवेगळया शासन व्यवस्थेत तो वेगवेगळया नावाने हा ओळखला जात असे.

सम्राट चंद्रगुप्त मौर्याने भारतात राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेचा पाया घातला त्याच्या प्रशासनात सोयीसाठी साम्राज्याचे विभाजन जनपद मध्ये (प्रांत) व जनपदचे(प्रांत) विभाजन प्रदेशात व प्रदेशाचे विभाजन आहारात (जिल्हा) आहाराचे विभाजन 'स्थानात' (तालुका) केले होते. आणि हा आजच्या जिल्ह्यासारखा प्रादेशिक प्रशासकिय विभाग होता. त्यानंतर गुप्तांच्या काळातही प्रशासकीय विकेंद्रीकरणाचे तत्व स्वीकारण्यात आलेले होते. संपूर्ण राज्याची विभागणी प्रांतातून केली होती त्याला 'देश' असे म्हटले जात असे त्याचा प्रमुख 'उपारिक' या नावाचा अधिकारी होता. जो आजच्या राज्यपाला समान होता ' देश'चे विभाजन 'भुक्ती'या प्रादेशिक विभागात केले होते. भुक्तीचे विभाजन 'विषय'या जिल्हा समान घटकात केले होते. विषयाचा प्रमुख प्रशासक 'विषयास्पती' हा आजच्या जिल्हाधिकाऱ्या समान असे.हजार ते दोन हजार ग्राम मिळून विषय'जिल्हा' बनत असे. मध्ययुगीन कालखंडातील मोगलांच्या काळातही अशाच प्रकारे प्रशासन व्यवस्थेचे विभाजन केले होते. संपूर्ण राज्याचे विभाजन 'सुभा' मध्ये केले होते ही त्या काळातील 'प्रांतीय प्रशासन'व्यवस्था होती, सुभ्याचे अर्थातच प्रांताचे विभाजन 'सरकार' मध्ये केले जाई हा विभाग आजच्या जिल्हा सारखा होता 'सरकार' हा तत्कालीन महत्त्वाचा प्रशासकीय घटक होता.ज्याचा प्रमुख म्हणून फौजदार नेमला जात असे. सरकार म्हणजेच संपूर्ण प्रशासनाची व्यवस्था त्याच्यावर सोपविलेली असे. तर 'अमील' किंवा'अमील गुजार" हा जिल्ह्याचा प्रमुख महसूल अधिकारी असे. जे कार्य आजचा जिल्हाधिकारी करतो सरकार (जिल्हा) चे विभाजन 'परगना' मध्ये केले जात असे परगना हा आजच्या तालुक्या सारखा असे 'परगणा'या प्रशासकीय घटकाचा प्रमुख'शिकदार' हा असे. त्या त्या काळातील शासन व्यवस्थेच्या ध्येयाप्रमाणे त्यांच्या कार्यात सुद्धा निश्चितच फरक होता.

भारतात आधुनिक प्रशासनाची सुरुवात ब्रिटिशांच्या काळात झाली व पारंपारिक प्रशासकीय व्यवस्था बदलण्यास प्रारंभ झाला. वॉरन हेस्टिंग यांच्या काळात 'जिल्हा' (District) ची निर्मिती झाली व त्याचबरोबर 'जिल्हाधिकारी' (District collector) या पदाची प्रस्थापना झाली .मुंबई प्रांतात इंग्रजी पद्धतीने १८१८ मध्ये जिल्हा प्रशासकीय स्तर स्थापन झाला. मराठ्यांच्या काळातील मामलेदारांच्या जागी तहसीलदाराच्या दर्जाचा अधिकारी प्रारंभी नेमण्यात आला

स्वातंत्र्याच्या नंतर भारताने लोकशाही शासनव्यवस्थेचा स्वीकार करून. संविधानाच्या माध्यमातून 'कल्याणकारी राज्य' व 'समाजवादी समाज रचना' निर्मितीचे धोरण स्वीकारले आहे. यासाठी जबाबदार विकेंद्रीत प्रशासन पद्धती निर्माण करावी लागली. समग्र भारतीय प्रशासनाचे केंद्र, राज्य, जिल्हा अशा प्रादेशिक प्रशासकीय विभागात विभाजन व प्रशासनाचे विकेंद्रीकरण केले आहे.विकास व कल्याणकारी योजना राबविण्यासाठी जिल्हा त्या खालोखाल तालुकास्तरावर केंद्र व राज्य सरकारची अनेक कार्यालये सुरू करण्यात आली. जिल्ह्याचे विभाजन उपविभागात व उपविभागाचे तालुक्यात करण्यात आले आहे .तालुका म्हणजे जिल्ह्याचा विभाग आहे. तामिळनाडूमध्ये तालुक्याला 'तालुक' म्हणतात तर महाराष्ट्रात 'तालुका' कोषागार, जमीन महसूल ,जमिनीच्या नोंदी, ठेवण्याबरोबरच ग्रामीण जनतेशी संवाद साधणारा व त्यांच्या अडीअडचणी समजून घेणारा नजीकचा प्रशासकीय घटक म्हणजे 'तालुका'होय व तेथील मुख्य प्रशासकीय कार्यालय तहसील कार्यालय आहे.तहसीलकार्यालयाचा प्रशासकीय प्रमुख अधिकारी 'तहसीलदार'असतो.जमीन महसूल जमा करण्याच्या प्रमुख कार्याबरोबरच तालुक्यात कायदा सुव्यवस्था सांभाळणे ,तुरुंग प्रशासन, निवडणुका उपकोषाधिकारी अशा विविध जबाबदाऱ्या त्याला पार पाडाव्या लागतात. पण महसुलाच्या कार्यावरूनच त्याच्या जबाबदारीचे मूल्यमापन होते . "तालुका कचेरीत बसून महसूल आपोआप गोळा होईल अशा भ्रमात राहणारी व्यक्ती जास्त काळ या पदावर राहू शकत नाही असे प्रा. श्रीराम माहेश्वरी यांनी म्हटले आहे .असे होऊ नये म्हणूनच तहसीलदारला काही अधिकार देण्यात आलेले असतात तालुका व तालुक्याचे तहसील प्रशासन हे एकूण भारतीय प्रशासन व्यवस्थेतील शेवटची व जनतेच्या अगदी जवळची प्रशासकिय यंत्रणा आहे. या यंत्रणेमार्फत तहसीलदारच्या प्रशासकीय नेतृत्वाखाली विविध विकासात्मक कल्याणकारी योजना व सेवा राबविल्या जातात. संपूर्ण तालुका प्रशासनावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य तहसीलदार करीत असतो. त्याच्याच नेतृत्वाखाली तालुक्यातील संपूर्ण प्रशासन व्यवस्था कार्यरत असते.

लोकशाहीत "लोककल्याण' साधण्यासाठीचे प्रमुख साधन प्रशासन आहे .याचा वापर शिस्तीने व विवेकाने झाला पाहिजे. राजकारण व प्रशासन यातील फरक आणि मर्यादा सांभाळल्या पाहिजेत ध्येय धोरण निश्चिती राजकारणाचा भाग आहे. पण एकदा धोरण निश्चित झाल्यानंतर ते कार्यान्वित करताना प्रशासनावर कसलेही राजकीय दडपण नको प्रशासन हे तज्ञाच्या कार्यक्षम यंत्रणेकडेच असले पाहिजे. धोरण अंमलबजावणीसाठी आवश्यक ती सत्ता ,अधिकार आणि जबाबदारी प्रशासन यंत्रणेला दिली पाहिजे.प्रशासनात वेळी-अवेळी अनिष्ट मार्गाने लोकप्रतिनिधी अथवा पक्षीय नेत्यांनी हस्तक्षेप केल्यास त्याचे परिणाम प्रशासनाची कार्यक्षमता आणि उपयुक्तता यावर दिसून येतात. तालुका प्रशासन प्रमुख तहसीलदारला अशा प्रसंगाला सामोरे जाण्याची वेळ येऊ नये असे वाटते. याबाबतीत पॉल ॲपलबी यांचे मत विचारात घेण्यासारखे आहे ते असे म्हणतात "प्रशासनाच्या कार्याच्या दृष्टीने वरच्या श्रेणीत

तत्त्वज्ञापेक्षा मुत्सद्दीची गरज अधिक आहे प्रचंड प्रमाणावर असलेल्या प्रशासनाच्या प्रक्रियेत प्रश्न आणि त्याचे उत्तरे यांची देवाणघेवाण अनेक स्तरातून होत असते पण अंतिम निर्णय घेण्याचे अवघड कार्य करण्यासाठी प्रशासनाच्या अतिउच्च श्रेणीत अशा व्यक्ती हव्यात की ज्यांना विशाल दृष्टिकोन आणि अमूर्त गोष्टीचा विचार करून चटकन निर्णय देता येतो" तालुका प्रशासनातील प्रमुख तहसीलदार यांनी याच पद्धतीने काम करावे ही अपेक्षा असते

आधुनिक काळात राज्याचे कार्यक्षेत्र व्यापक झाले आहे. त्यामुळे शासक वर्गाच्या सत्तेत, स्वरूपात अधिकार, जबाबदारीत महत्त्वाचे बदल घडून आले आहेत. शासन संस्थेचे बाह्य स्वरूप कोणतेही असले तरी नागरिकांना त्याचा प्रत्येय प्रशासकाद्वारेच येतो शासनाची ओळख प्रशासनाच्या कार्यावरूनच होत असते. प्रशासनातील कर्मचाऱ्यांच्या अधिकाऱ्यांच्या प्रमाणिकतेवर शैक्षणिक पात्रतेवर कार्यक्षमतेवर शासनाची यशस्विता अवलंबून असते. प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेला 'तालुका' हा प्रशासकीय विभाग समकालीन राजकीय व्यवस्थेचा आधारभूत घटक म्हणून आलेला आहे. स्वातंत्र्योत्तर भारतीय प्रशासन व्यवस्थेचाही हा पायाभूत स्तर आहे .सर्वसामान्य जनतेच्या अगदी जवळचा असलेला हा प्रशासकीय स्तर व त्याचा प्रमुख तहसीलदार आपली कार्यात्मक जबाबदारी कशी पार पाडत आहे. शासकीय ध्येय धोरणाची अंमलबजावणी करून सर्वसामान्य माणसांना कशी सेवा देत आहे. जनतेचे त्याबाबत काय मत आहे. जिल्हा प्रशासनाच्या मार्फत राज्य प्रशासनाशी त्याचे संबंध कसे आहेत या सर्व बाबींचा सर्वांगीण अभ्यास संशोधनाचा विषय आहे.

१.२. विषय निवडीचा हेतू:

आज शासनामार्फत सामान्य नागरिकांच्या कल्याण व विकासाच्या दृष्टीने अनेक कार्यक्रम व योजना राबविल्या जात आहेत. या सर्व बाबींची माहिती सामान्य माणसांपर्यंत पोहोचविण्याचे काम प्रशासनामार्फत होत असते. अलीकडच्या काळात राज्याच्या कार्यक्षेत्रात अनेक कारणाने वाढ झाली आहे.भारतीय प्रशासनाचा तालुका हा शेवटचा स्तर आहे. तहसील कार्यालय त्याचे मुख्यालय आहे. तालुका प्रशासनाचा प्रमुख 'तहसीलदार' आहे. प्रशासन व्यवस्थेतील शेवटची प्रशासकीय यंत्रणा असून या यंत्रणेच्या माध्यमातून तालुक्यात विकासात्मक स्वरूपाच्या योजना अखंडपणे राबविणे गरजेचे आहे. तालुका प्रशासन व तहसील कार्यालय तहसीलदारच्या प्रशासकीय नेतृत्वाखाली शासनाच्या योजना काटेकोरपणे राबवीत आहे. ज्यातून सामान्य नागरिकांची सेवा केली जाते लोकशाही, कल्याणकारी राज्याचे यश यातच आहे. भारतासारख्या विकसनशील राष्ट्रात तर त्याची अत्यंत गरज आहे. पारंपारिक दृष्टीने विचार करता वेगवेगळ्या राज्यांच्या राजवटीत असा एखादा प्रशासकीय घटक कार्यरत होताच पण कार्याची कक्षा ,स्वरूप व उद्देश आजच्या पेक्षा निराळा असे.त्या पारंपारिक कार्याबरोबरच आजच्या आधुनिक प्रशासनात जिल्हा प्रशासनाचा एक विभाग म्हणून तालुका प्रशासन प्रत्येक राज्यात निर्माण करण्यात आलेला आहे. राज्यपरत्वे या प्रशासकीय स्तराला वेगळे नाव असेल पण ग्रामीण जनतेशी प्रत्यक्ष संवाद साधणारा

कृषीप्रधान भारतातील शेतकऱ्याचे हित रक्षण करणारा घटक म्हणजे 'तालुका' व तालुका प्रशासनावरील 'तहसील कार्यालय' आहे.त्याचा प्रशासकीय प्रमुख अधिकारी तहसीलदार असतो महसूल जमा करण्याच्या कार्याबरोबरच तालुक्यात कायदा व सुव्यवस्था तुरुंग प्रशासन इत्यादी सह अनेक विकासात्मक, कल्याणात्मक व सेवा विषयक जबाबदाऱ्या त्याला पार पाडाव्या लागतात ही जबाबदारी पार पाडत असताना तालुका पातळीवरील सर्व कार्यालयाशी समन्वय साधावा लागतो. जिल्हा प्रशासन व त्यापुढे राज्य शासनाची संपर्क प्रस्थापित करून आपल्या प्रशासकीय नेतृत्वाखाली विकासात्मक जबाबदारी तहसीलदारला पार पाडावी लागते.लातूर जिल्ह्यातील सर्व तहसीलदार ही जबाबदारी पार पाडून तालुका विकासाला कसा न्याय देत आहेत. हे समजून घेण्यासाठी हे संशोधन कार्य होणार आहे.

१.३.समस्या सुत्रण :

एकविसाव्या शतकातील लोकप्रशासनाच्या स्वरूपावर दृष्टिक्षेप टाकल्यास असे दिसते की ,लोक कल्याणकारी राज्याची चौकट कायम ठेवून जागतिक स्तरावरील बदलाचा प्रभाव लोकप्रशासनावर पडलेला आहे.खाजगीकरण, जागतिकीकरण व उदारीकरण या संकल्पना आणि माहिती तंत्रज्ञानाचा उदय व विकास यामुळे प्रशासनातील वाढते संगणकीकरण म्हणजेच ई- प्रशासन यामुळे लोकप्रशासनाचे पारंपारिक स्वरूप, संघटन व भूमिकेत क्रांतिकारक बदल होत आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या विकासामुळे आधुनिक युग प्रशासनाच्या दृष्टीने ई- प्रशासन ,सु-शासन ,लोक निवड दृष्टिकोनाचे आहे. या प्रशासकीय संकल्पनांच्या विकासामुळे वेगवेगळया स्तरावरील प्रशासकीय घटक व त्याच्या प्रमुख प्रभारी अधिकाऱ्याच्या कार्यात्मक जबाबदारीत वाढ झाली आहे. या वाढत्या जबाबदाऱ्या व कार्य पार पाडण्यासाठी कौशल्यपूर्ण व गुणवत्ता प्राप्त अधिकाऱ्यांचा तुटवडा आज जाणवत आहे. आधुनिक तंत्रज्ञानामुळे जुने मनुष्यबळ व आधुनिक सुधारणा याचा मेळ घालने अवघड जात आहे .अशा वातावरणात व परिस्थितीत शैक्षणिक दृष्ट्या पुढारलेल्या लातूर जिल्ह्यातील जुन्या व नव्या तालुक्याचे तहसीलदार अशा प्रकारच्या अनेक प्रशासकीय समस्या योग्य प्रकारे हाताळत आहेत काय? व लोक कल्याणकारी राज्याची संकल्पना अमलात आणत आहेत काय?जनताभिमुख प्रशासन निर्माणसाठी प्रयत्न करीत आहेत का?. लोकप्रतिनिधी व वरिष्ठ प्रशासक यांच्याशी त्यांच्या सहसंबंधाची स्थिती काय आहे?अधिनस्त कर्मचारी व तहसीलदार यांच्यात समन्वय आहे का? यांचे संबंध कसे आहेत हे अभ्यासणे प्रशासकीय दृष्ट्या महत्त्वाचे वाटते म्हणून अभ्यासासाठी 'राज्य प्रशासनात तहसील दारांची भूमिका :एक अभ्यास' विशेष संदर्भ लातूर जिल्हा हा विषय निवडलेला आहे.

१.४. संशोधनाची उद्दिष्टे:_

व्ही.एच.मोरी"संशोधन म्हणजे नवीन ज्ञान मिळविण्यासाठी केले जाणारे पद्धतशीर प्रयत्न"असे म्हणतात तेव्हा नवीन ज्ञान मिळविणे हे संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टे असते याबरोबरच प्रस्तुत संशोधनाची काही उद्दिष्टे निर्धारित केलेली आहेत.

१) भारतीय प्रशासन व्यवस्थेचे समग्र संघटन समजून घेणे.

२) राज्य प्रशासनात तहसीलदार ची भूमिका समजून घेणे.

३) तहसीलदार प्रशासनाच्या वाढलेल्या जबाबदाऱ्या कशा पार पाडतात हे अभ्यासणे.

४) तहसीलदाराने तालुका प्रशासनात केलेल्या काळ सुसंगत सुधारणा व बदल अभ्यासणे

५) तालुका तहसीलदारांना प्रशासनाची बदललेली तंत्रे ई- प्रशासन अवगत आहे का? याचा अभ्यास करणे

६) तालुका तहसीलदार व नागरिक यांच्यातील' जनसंपर्क'चा अभ्यास करणे.

७) तहसीलदार व अधिनस्त कर्मचारी यांच्यातील समन्वयाचा शोध घेणे.

८) तालुका तहसीलदारांचा राजकीय सहसंबंध व संपर्क अभ्यासणे.

९) तहसीलमार्फतच्या विविध सेवा व योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळतो का? याबाबतीत जनमत आजमावणे

१.५. गृहीतके:

१) तहसीलदार तालुका प्रशासनाच्या वाढलेल्या जबाबदाऱ्या यशस्वी पणाने पार पाडत आहेत.

२) तहसीलदारांचा राज्य शासनातील पदाधिकारी व वरिष्ठांशी संपर्क प्रभावी आहे.

३) लोकशाही, कल्याणकारी राज्य निर्माणासाठी तहसीलदार योगदान देत आहेत.

४) तहसीलदार व जनता यांच्यातील सुसंवादामुळे शासकीय जनसंपर्क सुदृढ होत आहे.

५) तहसीलदार व अधिनस्त यांचा समन्वयात्मक संवाद आहे

६) आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे तहसील प्रशासनाची कार्यक्षमता वाढली आहे.

७) सु-शासनाच्या निर्मितीत तहसीलदारांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे.

१.६.अभ्यासाचे महत्त्व:

आधुनिक कल्याणकारी राज्यात शासनाकडून लोक कल्याणासाठी अनेक योजना व सेवा अमलात आणल्या जात आहेत. यासाठी केंद्र पातळीपासून तालुका पातळीपर्यंत शिस्तबद्ध प्रशासकीय व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. तालुका प्रशासकीय स्तरावर यासाठी तहसील कार्यालय आहे. या कार्यालयाचा प्रमुख तहसीलदार आहे. जिल्हा प्रशासनातील हे महत्त्वाचे पद आहे प्राचीन काळापासून अस्तित्वात असलेल्या या पदाच्या कार्यात व जबाबदारीत काळानुसार बदल होत आलेला आहे. आजही हे भारतीय प्रशासनात हे पद व त्याची प्रशासकीय जबाबदारी भारतीय प्रशासनात अत्यंतिक महत्वाची आहे. सु- शासन , ई- शासन ,लोक निवड दृष्टिकोनाच्या पार्श्वभूमीवर लातूर जिल्ह्यातील तहसीलदार याबदलत्या वातावरणात आपली भूमिका कशी पार पाडत आहेत व त्यामुळे तालुक्याचा प्रशासकीय दृष्ट्या विकास कसा होत आहे. जनतेची याबाबतीत काय धारणा व मत आहे हे या अभ्यासाच्या माध्यमातून कळून येईल या दृष्टीने हा अभ्यास महत्त्वाचा आहे.

१.७. अभ्यासाचे क्षेत्र:

राज्य प्रशासनात तहसीलदार ची भूमिका संशोधनाचा विषय आहे तहसील कार्यालय प्रशासकीय रचना कार्यपद्धती (महसूल कायदा व सुव्यवस्था पुरवठा विविध योजना व सेवा आणि जबाबदारी) यात तालुका तहसीलदारांची पारंपारिक भूमिका व बदलती भूमिका यासंदर्भात हा अभ्यास आहे यासाठी विशेष संदर्भ लातूर जिल्ह्यातील तालुक्याचे तहसीलदार आपली भूमिका कशी पार पाडत आहेत. या अनुषंगाने हा अभ्यास इ. स २००० पासूनचा केला जाणार आहे.

१.८. तथ्य संकलन:_

संशोधन विषय निश्चित झाल्यानंतर त्या विषयासंबंधीचे तथ्य गोळा करणे अत्यंत गरजेचे असते. त्यातून वस्तुनिष्ठ व सर्व सामान्य निष्कर्ष प्राप्त होतात. गुड आणि हॉट असे म्हणतात "तथ्य एक अनुभव सिद्ध सत्यापनीय निरीक्षण आहे" संशोधनाचे यश,अपयश तथ्य संकलन साधनाच्या विश्वसनीयतेवर आधारलेले असते. प्रस्तुत अभ्यासात तथ्य संकलनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे.

१.८.१.प्राथमिक स्त्रोत:

प्रा.रॉबटेशन आणि राईट प्राथमिक स्त्रोताबद्दल असे म्हणतात "विशिष्ट संशोधन समस्येचा अभ्यास करण्याच्या निश्चित हेतूसाठी जी माहिती संघटित केली जाते त्यास प्राथमिक सामग्री असे म्हणतात" सदर अभ्यासात प्राथमिक स्त्रोत म्हणून मुलाखत ,प्रश्नावली, अनुसूची ,निरीक्षण इ. प्राथमिक स्त्रोतांचा आधार घेतला जाणार आहे .यामध्ये तहसीलदार, नायब तहसीलदार अव्वलकारकून लिपिक व तहसील

कार्यालयातील विविध विभागांना भेटी देणाऱ्या व तहसील कार्यालया मार्फत पुरविल्या जाणाऱ्या विविध योजना, सेवा व कार्याचा लाभ घेणाऱ्या लाभार्थ्यांच्या मुलाखती व प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित केली जाणार आहे.

१.८.२. द्वितीय स्त्रोत:

संशोधक स्वतः संकलित करत नाहीत तर इतर व्यक्तींनी संशोधक अभ्यासकांनी संकलित व लिखित केलेली असतात. प्रस्तुत संशोधना सबंधी प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्र तहसील प्रशासनाचे अहवाल, वर्तमानपत्र दस्ताऐवज शासकीय परिपत्रक इत्यादी लिखित साधनाचा आधार घेतला जाणार आहे.

१.९. नमुना निवड:

संशोधन कार्यात संशोधनाच्या नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला जाणार आहे.डॉ.गुड व हॉट नमुना निवडीची व्याख्या अशी करतात "नावाप्रमाणे नमुना म्हणजे समग्राचा लहानसा प्रतिनिधी होय "म्हणजेच संपूर्ण समग्राचा अभ्यास न करता समग्रातील प्रातिनिधिक घटकाचा अभ्यास करणे होय. संबंधित संशोधनात तालुक्यातील संपूर्ण जनतेचे तहसील कार्यालय तहसील कार्यालयाचे प्रमुख तहसीलदार व त्यांच्या भूमिकेबद्दल असलेले मत व धारणा जाणून घेण्यासाठी काही नागरिकांची निवड केली जाणार आहे. तहसील कार्यालयाला भेटी दिलेले नागरिक विविध सेवांचा लाभ घेणारे लाभार्थी या पैकी काहींची यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड केली जाईल व त्यांच्याकडून प्रश्नावली ,मुलाखती व अनुसूचीच्या माध्यमातून तथ्यसंकलन केले जाईल.

१.१०. प्रकरणांची मांडणी:

प्रकरण१: प्रास्ताविक

प्रकरण २: राज्य प्रशासनातील तहसीलदार पद: एक दृष्टिक्षेप

प्रकरण ३: तहसील भ कार्यालय रचना व कार्य

प्रकरण ४: क्षेत्र कार्य व अभ्यासाचे मूल्यमापन

प्रकरण ५: समापन

१.११. संदर्भ ग्रंथ:

१) व. म. सिरसीकर: राज्यशास्त्र आणि शासन संस्था १९७०, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
२) बी.बी पाटील: लोकप्रशासन, १९९८ फडके प्रकाशन,कोल्हापूर.
३) फाडिया बी.एल :लोकप्रशासन व शोध प्रविधी २००४ साहित्य भवन पब्लिकेशन, आग्रा.

४) अवस्थी अँड अवस्थी: रिवेन्यू इन्स्पेक्शन अँट डिस्ट्रिक्ट लेव्हल १९६५इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ पब्लिक ऍडमिनिस्ट्रेशन, नवी दिल्ली.

५) अरुण कुमार:लोकप्रशासन आज आणि उद्या २००० अनमोल प्रकाशन, नवी दिल्ली.

६) एम.आय.खान: भारतातील जिल्हा प्रशासन १९९७ अनमोल पब्लिकेशन पी. व्ही. टी. लि नवी दिल्ली.

७) डॉ.सुरेंद्र कटारिया : लोकप्रशासन, २००३ राजस्थान हिंदी ग्रंथ अकॅडमी, जयपूर.

८) बी.एम चोपडा :लोकप्रशासन २००३ गीतांजली प्रकाशन जयपुर.

९) डॉ. के आर बंग: भारतीय प्रशासन, १९९९ कैलास प्रकाशन औरंगपुरा, औरंगाबाद.

१०) बी.वाय कुलकर्णी/ अशोक नाईकवाडे: भारताचे शासन व राजकारण २००३श्री विद्या प्रकाशन, पुणे.

११) डॉ. व्यंकट विळेगावे :राज्य व जिल्हा प्रशासन २००३, अरुणा प्रकाशन ,लातूर.

१२) माहेश्वरी श्रीराम .भारतीय प्रशासन२००२ अनुवादित ओरिएंट लॉंग मॅन ,मुंबई.

१३) डॉ. भांडवलकर मौर्य साम्राज्याचा इतिहास १९८१ सत्यकेतू विद्यासागर प्रकाशन.

१४) गायकवाड, सर देसाई थोरात होनमाने. मध्येयुगीन भारताचा इतिहास १९९०फडके प्रकाशन ,कोल्हापूर.

१५) कठारे अनिल आधुनिक भारताचा इतिहास २००२ कल्पना प्रकाशन .नांदेड.

१६) डॉ. गुरुनाथ नाडगोंडे सामाजिक संशोधन पद्धती. २००३ फडके प्रकाशन ,कोल्हापूर.

१७) डॉ. बी.एन कराडे शास्त्रीय संशोधन पद्धती २००५ पिंपळापुरे अँड पब्लिकेशन, नागपुर.

१८) प्रा. के. आर बंग: भारतीय प्रशासन व संविधानात्मक प्रक्रिया.२०११ विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद.

टीप: सदरील संशोधन आराखड्यात आवश्यकतेप्रमाणे बदल होऊ शकतो.

संशोधक

प्रा. संजय अंकुशराव जगताप

लोकप्रशासन विभाग,

महात्मा फुले महाविद्यालय, किनगाव,

ता. अहमदपूर जि. लातूर

मार्गदर्शक

डॉ. बंजारा दिलीप लालू,

लोकप्रशासन विभाग प्रमुख,

महात्मा गांधी महाविद्यालय, अहमदपूर,

ता. अहमदपूर जि. लातूर